06 APR 2022
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे कोल्हापुरात स्वागत



कोल्हापूर : विमानतळावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करताना पालकमंत्री सतेज पाटील, सोबत जिल्हाधिकारी राहूल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राज्याचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोशयारी यांचे मंगळवारी सकाळी सव्वा दहा वाजता कोल्हापूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी पालकमंत्री सतेज पाटील, जिल्हाधिकारी राहूल रेखावार यांनी पुष्पगुच्छ देवून राज्यपाल कोश्यारी यांचे स्वागत केले.

कोल्हापुरातील महासैनिक दरबार हॉल येथे होत असलेल्या पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन आणि शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात घोषीत केलेल्या राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदकांचे संबंधितांना प्रदान करण्यासाठी राज्यपाल कोल्हापूर दौऱ्यावर आहेत.

यावेळी पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विमानतळ विकास प्राधिकरण संचालक कमल कटारिया आदी उपस्थित होते.

लोकमत



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे मंगळवारी कोल्हापुरात विमानतळावर आगमन झाले. पालकमंत्री सतेज पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मोहन गोस्वामी, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांचे मंगळवारी सकाळी कोल्हापूर विमानतळावर आगमन झाले. पालकमंत्री सतेज पाटील तसेच जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

कोश्यारी हे कोल्हापुरात होत असलेल्या पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी तसेच शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात घोषित करण्यात आलेली राष्ट्रपती व कुलपती यांची सुवर्णपदके प्रदान करण्यासाठी आले आहेत. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस प्रमुख शैलेश बलकवडे , शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी .टी. शिर्के , प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विमानतळ विकास प्राधिकरण संचालक कमल कटारिया उपस्थित होते.

0 6 APR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोरोनाने निर्माण झालेली कमतरता मेहनतीने भरून काढा

## भगतसिंह कोश्यारी : ऐश्वर्या मोरे, स्वाती पाटील, मयूरेश शिखरे याचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनामुळे गेल्या दोन वर्षात शिक्षणात खंड पडल्याने काही कमतरता निर्माण झाल्या आहेत. त्या भरून काढण्यासाठी आता कोरोनाचा काळ विसरून विद्यार्थी, शिक्षकांनी दुप्पट मेहनत करावी. कोणत्याही क्षेत्रात राहा; पण, मेहनत करून स्वतःसह विद्यापीठ, देशाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या दीक्षान्त समारंभात घोषित करण्यात आलेल्या विविध पदकांच्या वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमात राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील ऐश्वर्या मोरे (रा. वडरगे, जि. कोल्हापूर) हिला क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र आणि एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्तेबद्दल राष्ट्रपतिपदक, सांगलीतील कस्तुरीबाई वालचंद महाविद्यालयातील स्वाती पाटील (दानोळी, ता. शिरोळ) यांना एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपतिपदक, तर विवेकानंद महाविद्यालयाच्या मयूरेश शिखरे (कोल्हापूर) याला कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्याबद्दल शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी केवळ दिसण्यापेक्षा अनेकविध चांगल्या गोष्टी करण्यावर अधिक भर द्यावा. देश आणि मातृभाषा यांच्याप्रति आदरभाव सदैव बाळगून कार्यरत रहावे. सर्व भाषा शिकाव्यात त्यांचा आदर करावा. त्यात मातृभाषेचे स्थान उच्च राहावे, असे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले. या कार्यक्रमास परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी ए. बी. पाटील आदींसह पदके, पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा मांडला. नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.




शिवाजी विद्यापीठात मंगळवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते ऐश्वर्या मोरे हिला राष्ट्रपतिपदक, स्वाती पाटील यांना कुलपतिपदक, तर मयूरेश शिखरे याला शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

### छ. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वामुळे आपले अस्तित्व

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र प्रेरणादायी आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आजचे आपले अस्तित्व आहे. त्याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करावे. त्यांच्या प्रेरणेतून स्वतःची उन्नती साधावी, असे आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

06 APR 2022 सकाळ

# शिवरायांच्या प्रेरणेतून प्रगती साधावी

## राज्यपाल कोश्यारी; शिवाजी विद्यापीठात मोरे, पाटील यांना पदके प्रदान





कोल्हापूर : सुवर्णपदक प्रदान समारंभात बोलताना कुलपती भगत सिंह कोश्यारी. दुसऱ्या छायाचित्रात कोश्यारी यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदक स्वीकारताना ऐश्वर्या मोरे. कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना स्वाती पाटील तर तिसऱ्या छायाचित्रात शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिक मयुरेश शिखरे याने स्वीकारले. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

कोल्हापूर, ता. ५ : “छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आपण जिवंत आहोत. अन्यथा गुलाम बनलो असतो याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करत प्रेरणा घेऊन प्रगती साधावी,” असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले. कोविड काळातील शैक्षणिक कमतरता भरून काढण्यासाठी दुप्पट मेहनत करावी, असे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात घोषित केलेले राष्ट्रपती सुवर्णपदक रसायनशास्त्र विभागातील ऐश्वर्या आकाराम मोरे हिला तर स्वाती गुंडू पाटील या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान केले. शहीद तुकाराम ओंबाळे पारितोषिक मयुरेश मधुसुदन शिखरे यास प्रदान केले. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

कुलपती कोश्यारी म्हणाले, “राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव आणि देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा योग जुळून आला आहे. विद्यापीठाने शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक दायित्वही निष्ठेने जपले आहे. कोविड कालखंडात विद्यापीठ, विशेषतः राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.”

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीस विद्यापीठाने सुरवात केल्याचे सांगितले. संशोधनात शिक्षकांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रमवारीत स्थान पटकावून लौकिक उंचावला. विद्यार्थिनी सबीना मुल्लाणी दिव्यांगांच्या ऑलिंपिकसाठी पात्र ठरल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### मेहनतीला पर्याय नाही

विद्यार्थ्यांनी मेहनत केल्याशिवाय काहीही घडत नसल्याचे जाणून नावलौकिक मिळविण्याचा प्रयत्न करावा. आपला देश संतांचा असून नैतिक मूल्ये जीवनात आचरणात आणावी. सर्व भाषा शिकल्या पाहिजेत, त्यांचा आदरही केला पाहिजे. पण मातृभाषेचे स्थान उच्च असावे. शिक्षकांनीही अभ्यासक्रम जास्तीत जास्त मातृभाषेतून कसे शिकविता येतील, याचा प्रयत्न करावा, असे कोश्यारी यांनी सांगितले.

0 6 APR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार प्रेरणादायी

## राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ दीक्षांत सोहळ्यातील राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदक प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्याधिष्ठीत शिक्षण मातृभाषेत दिले जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या मावळ्यांचा इतिहास प्रेरणादायी आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आपले अस्तित्व आहे, याचे भान राखून विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या प्रेरणेतून स्वतःची प्रगती साधावी, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात घोषित केलेल्या राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदके तसेच शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिक प्रदान समारंभ कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात रसायनशास्त्र विभागाच्या ऐश्वर्या मोरे यांना राष्ट्रपती सुवर्णपदक, सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती पाटील यांना कुलपती सुवर्णपदक, 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह' विवेकानंद महाविद्यालयाच्या मयुरेश शिखरे यांना कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान केले.


कोल्हापूर : कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राष्ट्रपती सुवर्णपदक ऐश्वर्या मोरे, कुलपती सुवर्णपदक स्वाती पाटील, 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्य पारितोषिक मयुरेश शिखरे यांना प्रदान केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. (छाया : रियाज ट्रेनर)

कुलपती कोश्यारी म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव आणि देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असा योग जुळून आला आहे. कोरोना, महापुराच्या काळात विद्यापीठाने सामाजिक जबाबदारी म्हणून भरपूर काम केले आहे. जिल्हा प्रशासनालाही सर्वोत्परी सहकार्य केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षेत्रात यशाच्या शिखरावर पोहोचावे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबरोबर विद्यापीठ, राज्य व देशाचेही नाव सुवर्णाक्षराने कोरले जाईल. सर्व भाषा शिका, तसेच त्याचा आदरही करा, पण त्यात मातृभाषेचे स्थान उच्च असले पाहिजे. ५० टक्के आयआयएस आणि आयपीएस अधिकारी मराठी शाळेतून शिकले आहेत. शिक्षकांनीही विविध भाषांचा अवलंब करून नवीन अभ्यासक्रम मातृभाषेतून शिकवावेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोरोनानंतर अधिविभाग, वसतिगृह सुरू झाली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठ तयार आहे. कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम तयार आहेत.' राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर सामंजस्य करार करून उपक्रम राबविले जात आहेत. संशोधनात जागतिक क्रमवारीत विद्यापीठाच्या शिक्षकांनी स्थान मिळवले आहे. सामाजिक बांधिलकी जपण्यात विद्यापीठ अग्रेसर आहे. क्रीडा क्षेत्रातही विद्यापीठाची विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळवले आहे.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील व सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यापीठाचे सर्व संवैधानिक अधिकारी, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 6 APR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मरण प्रेरणेतून विद्यार्थ्यांनी उन्नती साधावी

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी; विद्यापीठात राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदक प्रदान सोहळा

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र प्रेरणादायी आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्त्वामुळे आपले अस्तित्व आहे, याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करावे. त्यांच्या प्रेरणेतून स्वत:ची उन्नती साधावी, असे आवाहन राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या दीक्षान्त समारंभात घोषित शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षातील ऐश्वर्या मोरेला शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगलीच्या स्वाती पाटीलला कुलपती सुवर्णपदक कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २०२०-२१




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ ५८व्या दीक्षान्त समारंभातील राष्ट्रपतींचे सुवर्णपदक ऐश्वर्या मोरेला तर कुलपतींचे सुवर्णपदक स्वाती पाटील, तुकाराम ओंबाळे पारितोषिक मयुरेश शिखरे यास प्रदान करताना कुलपती भगतसिंह कोश्यारी. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील. (छाया : नाज ट्रेनर)**

या शैक्षणिक वर्षातील केंट क्लब निर्मित शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्राविण्य पारितोषिक विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी मयुरेश शिखरे यास कुलपतींच्याहस्ते देण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत छत्रपती शिवाजीमहाराजयांच्यानावानेअसलेल्या शिवाजी विद्यापीठाचा हिरकमहोत्सव, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असा योग जुळून आला आहे. विद्यापीठाने कोरोना काळात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांनी सर्व भाषा शिकण्याबरोबरच सर्व भाषांचा आदर केला पाहिजे. त्यात मातृभाषेचे स्थान उच्च असावे. शिक्षकांनी विविध भाषांचा अवलंब करून मातृभाषेतून कसे शिकविता येतील, याद्दष्टीने प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

### महाराष्ट्र संतांचा प्रदेश

महाराष्ट्र संतांचा प्रदेश आहे. त्यांनी दिलेली नैतिक मूल्ये जीवनात आचरण करावीत. यासाठी विद्यार्थ्यांनी रामायण, महाभारत याचबरोबर ज्ञानेश्वरी वाचावी. त्यांच्या स्मरणातूनच ताकद, प्रेरणा मिळेल. 'अच्छा करोगे, तो चार चाँद लगेंगे' असे म्हणत कुलपती कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

### विद्यार्थिनीची आशियाई स्पर्धेसाठी निवड ही अभिमानाची बाब

क्रीडा क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी सबिना मुलाणी ब्राझीलमध्ये होणाऱ्या कर्णबधिरांसाठीच्या ऑलिंपिकसाठी पात्र ठरली आहे. स्वाती शिंदे विद्यार्थिनीची मंगोलियात होणाऱ्या आशियाई स्पर्धांसाठी निवड झाली आहे. ही अभिमानाची बाब असल्याचे कुलगुरु डॉ.शिर्के म्हणाले.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. ते म्हणाले, कोरोनाच्या सावटातून प्रदीर्घ कालावधीनंतर विद्यार्थ्यांचे विद्यापीठ आवारात आगमन झाले, ही समाधानाची बाब आहे. विद्यापीठ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०च्या अंमलबजावणीसाठी तयार आहे. एकात्मिक अभ्यासक्रम, कौशल्य विकासशिक्षणवप्रशिक्षण, मूल्यशिक्षण, मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडविण्यास विद्यापीठ तत्पर आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

06 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनीही दुप्पट मेहनत करावी :राज्यपाल

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोविडच्या काळातील दोन वर्षांत शैक्षणिकबाबतीत खंड पडला. आता विद्यार्थी-शिक्षकांनी दुप्पट मेहनतीने हे नुकसान भरून काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात घोषित करण्यात आलेल्या राष्ट्रपती व कुलपती यांची सुवर्णपदके तसेच शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिक प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते.

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, सध्याच्या विद्यार्थ्यांनी आपल्या दिसण्यावर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे विविध ॲप्स पाहिले की सहज निदर्शनास येत आहे. केवळ दिसण्यापेक्षा अनेकविध चांगल्या गोष्टी करण्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी मेहनत करून नावलौकिक मिळवण्याचा प्रयत्न करावा.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र प्रचंड प्रेरणादायी आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आपले अस्तित्व आहे, याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करावे आणि त्यांच्या प्रेरणेतून स्वतःची उन्नती साधावी. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव आणि देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असा योग जुळून आला आहे, ही महत्त्वाची बाब आहे. विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक दायित्वही निष्ठेने जपले आहे. कोविडच्या कालखंडात विद्यापीठ परिवाराने विशेषतः राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे, हे अत्यंत अभिमानास्पद आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रपती सुवर्णपदक स्वाती गुंडू पाटील यांना प्रदान करताना कुलपती भगतसिंह कोश्यारी. सोबत कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (वडरगे, ता. गडहिंग्लज) या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक तसेच एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (दानोळी, ता. शिरोळ) या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील केंट क्लब, कोल्हापूर निर्मित 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्राविण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह' मयुरेश मधुसूदन शिखरे (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) या विद्यार्थ्यास कुलपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 APR 2022 Times of India

# Students should give more priority to doing good things, than looks: Koshyari

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Maharashtra Governor Bhagat Singh Koshyari on Tuesday said after seeing social media, it appeared like the students these days were focusing on their looks.

He said the students should ensure more priority on doing good things instead of only focusing on looks.

He was speaking at a function held at Shivaji University in Kolhapur on Tuesday, where he handed over medals to meritorious students. An award named after Tukaram Ombale, a Mumbai police officer who had laid down his life while fighting terrorists during the 26/11 attack, was given to Vivek Madhusudan Shikhare from Vivekanand college for excelling in arts, literature and culture.

TOI



Maharashtra Governor Bhagat Singh Koshyari addresses a function at Shivaji University

"When I see various apps, social media, I feel that today's students focus on how they look. Instead of just focusing on looks, it is important focus on several good things. They should try to excel in any field and get fame. We should all together walk on the path of progress," said Koshyari.

He also said that the students should learn all languages, but give highest priority to their mother tongue. He also suggested that the professors should use their mother tongue while teaching the students.

Vice-chancellor DT Shirke said the SUK is ready to implement the New Education Policy, 2020.

Koshyari also inauguration of the convention organised by the union cultural ministry to promote the literature written by various saints like Sant Dnyaneshwar, Sant Tukaram and the progressive movements run by them. Speaking at the Vishwatmak Sant Sahitya Sammelan, the governor said,

"The entire universe is our home and it was the teachings of our saints. However, we are going away from this thought and are increasingly becoming self-centric. We are all the children of God. Warkaris visiting Pandharpur on their feet is one such example. I am donating Rs 5 lakh for the organisers to conduct such programmes."

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ देणार महाविद्यालयांना विशेष निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील रौप्य, सुवर्ण आणि शतकोत्तर महोत्सव साजरे करणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांना विशेष निधी देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने मंगळवारी घेतला. त्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अशा महाविद्यालयांना अडीच लाख ते दहा लाखांपर्यंत विशेष निधी देण्यात येणार आहे. या निधीतून विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागात सर्व विद्यापीठांना एंट्रनशीप करता येणार आहे. त्याला या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुढारी

# अवकाश शास्त्रज्ञ प्रा. जैन यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागामध्ये बुधवारी (दि.६) आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अवकाश शास्त्रज्ञ प्रा. राजमल जैन यांचे व्याख्यान सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. व्याख्यानात '२१ व्या शतकातील सूर्यावरील चुंबकीय बदलांमुळे निर्माण होणारे सौरडाग व सौरवादळे तसेच ग्लिसबर सायकल आणि त्याच्या अनुषंगाने येऊ घातलेले पृथ्वीवरील वातावरणामध्ये होत असलेले बदल' याविषयी ते प्रामुख्याने बोलणार आहेत. विद्यार्थी, नागरिकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# प्रा. राजमल जैन यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागामध्ये बुधवार, दि. ६ एप्रिल रोजी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अवकाश शास्त्रज्ञ प्राध्यापक राजमल जैन यांचे व्याख्यान सकाळी ११.३० वाजता होणार आहे. प्रा. जैन हे उदयपूर सौर वेधशाळेचे संस्थापक सदस्य असून, त्यांनी इस्त्रोच्या 'सोलर एक्स-रे स्पेक्ट्रोमीटर' मिशनचे प्रकल्प संचालक तसेच स्वीपस-चांद्रयान-२, पेस-मंगलयान-१, आणि स्वातिस-आदित्य मिशन आदींचे प्रकल्पप्रमुख म्हणूनही काम केले आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

सकाळ

# संलग्न महाविद्यालयांना निधी

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आज बैठक झाली. यामध्ये विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांना विशेष निधी दिला जाणार आहे. यामध्ये ज्या महाविद्यालयांचे रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव किंवा शतकोत्तर महोत्सव असतील यांना अडीच लाख ते दहा लाखांपर्यंतचा निधी दिला जाणार आहे. तसेच विद्यापीठातील सर्व विद्यार्थ्यांना संगणकशास्त्र विभागात इंटर्नशिप करण्याची संधी दिली जाणार आहे. पूर्वी एखाद्या व्यक्तीला विद्यापीठाला देणगी द्यायची असेल तर ३ लाख रुपयांची किमान मर्यादा होती. त्यामुळे अनेकांना इच्छा असूनही देणगी देता येत नव्हती. आता ही मर्यादा एक लाखापर्यंत आहे. हे निर्णय व्यवस्थापन परिषदेत करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

सकाळ

# शास्त्रज्ञ प्रा. जैन यांचे आज व्याख्यान



प्रा. राजमल जैन

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अवकाश शास्त्रज्ञ प्रा. राजमल जैन यांचे शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात बुधवारी (ता. ६) व्याख्यान आहे. सकाळी साडेअकरा वाजता होणाऱ्या व्याख्यानात २१ व्या शतकामधील सूर्यावरील चुंबकीय बदलांमुळे निर्माण होणारे सौर डाग व सौर वादळे तसेच ग्लिसबर सायकल आणि त्याच्या अनुषंगाने येऊ घातलेले पृथ्वीवरील वातावरणातील बदल यावर ते बोलणार आहेत. जैन हे उदयपूर सौर वेधशाळेचे संस्थापक सदस्य असून त्यांनी इस्त्रोच्या 'सोलर एक्स-रे स्पेक्ट्रोमीटर' मिशनचे प्रकल्प संचालक, स्वीपस-चांद्रयान-२, पेस-मंगलयान-१, आणि स्वातिस-आदित्य मिशन आदींचे प्रकल्प प्रमुख म्हणून काम केले आहे.

0 6 APR 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धेमुळे स्वतःतील आत्मविश्वास दृढ

## डॉ. व्ही. एन. शिंदे; न्यू कॉलेजमध्ये 'न्यू होरायझन' राज्यस्तरीय स्पर्धा

**कोल्हापूर, ता. ५ :** 'स्पर्धेमुळे स्वतःमधील आत्मविश्वास दृढ होतो,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

न्यू कॉलेज येथे कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे 'न्यू होरायझन २०२२' ही राज्यस्तरीय ऑनलाईन पेपर प्रेझेंटशन, पोस्टर प्रेझेंटेशन झाले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील उपस्थित होते. पाटील यांनी विद्यार्थ्यांना अशा स्पर्धेत भाग घेतलेमुळे निर्माण होणारा आत्मविश्वासच पुढील जीवनात यशस्वी होण्यास मदत करतो. नवीन संशोधन, प्रयोग करण्यात अशा प्रकारच्या स्पर्धा प्रोत्साहित करतात, असे सांगितले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले.

कॉम्प्युटर सायन्स विभागाने प्रमुख डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी प्रास्ताविक केले. प्रा. श्रीमती एस. जी. देशमुख यांनी परिचय करून दिला. बीसीएस विभागाच्या १० विद्यार्थ्यांची विविध आयटी कंपनीत निवड झाल्याबद्दल सत्कार झाला. संचालक डॉ. पी. के. पाटील, आर. डी. पाटील, सविता पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख उपस्थित होते. प्रा. डॉ. ममता एस. कलस, प्रा. अमर ए. दुम, प्रा. डॉ उमा गुरव, प्रा. डॉ. तेजस्विनी हिलगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रियांका शिंगाडे, सोमनाथ तोरसे यांनी सूत्रसंचलन केले, प्रा. ए. एस. अष्टेकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे.

### विजेते असे...

पेपर प्रेझेंटेशन : ग्रेसी ख्रिस्तोफर लोखंडे (न्यू कॉलेज), वर्षा पाटील (कमला कॉलेज), ऋषीकेश साळोखे, अवधूत लाड (न्यू कॉलेज), विभागून : शीतल गोंधळी (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज) : पोस्टर प्रेझेंटेशन : स्वप्निल गायकवाड, सतीश जाधव, सानिका जाधव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 APR 2022
तरूण भारत

# अण्णाभाऊंच्या विचारांना ऊर्जा देणारी कविता

## डॉ. सबनीस यांचे प्रतिपादन : 'या शकलांना सांधूया' चे प्रकाशन : मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकशाहीर अण्णाभाऊंच्या वैश्विक विचारांना तितक्याच समर्थपणे कवी प्रकाश नाईक यांनी दीर्घ कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त केले आहे. ही दीर्घ कविता अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या क्रांतिकारी वैश्विक महानायकाला कवितेच्या माध्यमातून व्यक्त करणे हा सांस्कृतिक इतिहास आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथे कवी प्रकाश नाईक यांच्या 'या सकलांना सांधूया" या दीर्घ कवितेच्या प्रकाशन समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



**कोल्हापूर : प्रकाश नाईक यांच्या या सकलांना सांधूया" या दीर्घ काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत डॉ. रणधीर शिंदे, राजाभाऊ शिरगुप्पे, माजी आमदार बाबासाहेब पाटील-सरूडकर व इतर.**

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांनी क्रांतिकारी विचार मांडला आहे. त्या विचारांचे प्रतिबिंब या कवितेत पडलेले असून ही कविता अण्णाभाऊंच्या विचारांच्या चळवळीला ऊर्जा देणारी आहे. समीक्षक मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र तत्वज्ञानाचे काव्यात्म रुप म्हणजे ही कविता आहे. राजाभाऊ शिरगुप्पे म्हणाले, भारतातल्या अलक्षित लोकांच्या वेदनेला वाचा फोडण्याचे साहित्य अण्णा भाऊ साठे निर्माण केले. माजी आमदार बाबासाहेब पाटील सरूडकर म्हणाले, ती कविता सर्व परिवर्तनवादी विचारांना ताकद देईल असा विश्वास वाटतो. यावेळी अशोक लोखंडे, प्रा. सुकुमार कांबळे, माजी आमदार राजीव आवळे, अरुण नरके, डॉ. उत्तम सकट, डॉ. शरद गायकवाड, भिकाजी लोखंडे, पी. जी. साठे, उपस्थित होते.